MHLA140020032019

## निशाणी क्र. ५ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी क्र.१ ते ३ यांनी प्रतिवादीं विरुध्द दावा मिळकतीत त्यांच्या शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्याकामी दाखल केला आहे. प्रस्तूत अर्जावर प्रतिवादींनी जवाबदावा तथा म्हणणे निशाणी क्र.१८ वर दाखल केले आहे. दोन्ही विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

(२). वादीचे असे कथन आहे की, ते परस्परांचे भाऊ असुन मौजे खरोसा ता.औसा जि.लातूर येथील सर्वे क्र.१५५/अ मधील पुर्वकडील बाजूस ३ एकर ३० गुंठे क्षेत्र वादीचे वडिलांना वाटणीमध्ये मिळाली होती. वादींनी पुढे असे कथन केले आहे की, सर्वे क्र.१५५/अ मधील पश्चिम बाजूचे ४ एकर १० गुंठे एवढे क्षेत्र वादीचे चुलते बस्वराज यांच्या वाटणीस आले होते. सदर वाटणीपत्रानुसार महसूल दप्तरी दिनांक १३/०७/१९९४ रोजी फेरफार क्र.१०४८ ची नोंद झाली. त्यानुसार वादीचे वडिल आणि बस्वराज आपआपल्या क्षेत्रामध्ये कब्जेवहिवाट करीत होते.

(३). वादी क्र.१ ते ३ यांच्या वडिलांना जमीन सर्वे नंबर १५५/अ मधील पुर्वेकडील बाजूच्या देण्यात आलेल्या क्षेत्र ३ एकर ३० आर या जमिनीवर ते हयात असे पर्यंत कायदेशीर व प्रत्यक्ष कब्जेवहिवाटदार म्हणून त्यांचा व त्यांच्या पश्चात म्हणजेच दिनांक ०६/०६/२०१८ रोजी मृत्यू झाल्यानंतर वादी क्र.१ ते ३ यांचा त्या जमीन मिळकतीचे कायदेशीर वारस व कायदेशीर मालक तसेच

प्रत्यक्ष कब्जेवहिवाटदार या नात्याने प्रत्यक्ष मालकी ताबा आहे. वादी क्र.१ ते ३ यांनी स्वतः अथवा त्यांच्या वडिलांनी प्रतिवादी यांच्याशी सदर जमिन मिळकतीबाबत कसल्याहीप्रकारचा तोंडी अथवा लेखी विक्री, भाडेकरार, गहाणखत याबाबत कसलाही व्यवहार केलेला नाही. तरी देखील प्रतिवादी हे गुंडगिरीच्या मनुष्यबळाच्या जोरावर वादी क्र.१ ते ३ यांच्या मालकीचे मौजे खरोसा ता.औसा येथील जमीन गट क्र.१५५/अ क्षेत्र १ हे. ५० आर. या मिळकतीवर दक्षिणेकडील बाजूने बेकायदेशीरपणे अनधिकृत अतिक्रमण करुन हरकती अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. वादी क्र.१ ते ३ यांनी वकिलार्मात पाठविलेली नोटीस प्रतिवादी यांना मिळाल्यानंतर प्रतिवादीने त्यास कसल्याही स्वरुपाचे उत्तर दिलेले नाही. परंतू दावा मिळकतीवर वादींच्या असणाऱ्या शांततामय कब्जेवहिवाटीस हरकती अडथळे निर्माण करुन दक्षिणेकडील बाजूने असणाऱ्या रस्त्या लगतच्या दावा मिळकतीमध्ये पत्र्याचे शेड उभे करण्याचे काम हे प्रतिवादीने दिनांक २९/०९/२०१९ रोजी चालू केले असता वादीने प्रतिवादींना तसे न करण्यास सांगितले असता प्रतिवादीस धमकी दिली की, दावा मिळकतीचे तुम्ही जरी कायदेशीर मालक व प्रत्यक्ष कब्जेवहिवाटदार असलात तरीही मी मनुष्य बळाच्या व गुंडगिरीच्या जोरावर तुमच्या दावा मिळकतीवर पत्र्याचे शेड उभा करुन अतिक्रमण करणार त्यामुळे प्रतिवादीने दावा मिळकतीस हरकत अडथळा करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूम द्यावा अशी वादींनी विनंती केली.

(४). प्रस्तुत अर्ज निकाली काढण्याकरीता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ निघतात. त्यांची कारणे व निष्कर्ष मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अनु क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादी प्रथम दर्शनी वस्तुस्थिती त्यांच्या लाभात असल्याचे सिद्ध करतात काय ? | नाही. |
| २ | वादी न्यायाचा समतोल त्यांच्या बाजुने असल्याचे सिद्ध करतात काय ? | नाही. |
| ३ | प्रस्तुतचा अर्ज नामंजूर केल्यास वादींचे कधीही न भरून येणारे अपरीमित असे नुकसान होईल असे वादी सिद्ध करतात काय ? | नाही. |
| ४ | काय आदेश व हुकूमनामा ? | अर्ज नामंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ ते ३ करीता :-**

(५). वादीच्या म्हणण्यानुसार दावा मिळकत गट क्र.१५५/अ १ हे. ५० आर. मध्ये त्यांची मालकी आणि वहिवाट आहे. प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार मौजे खरोसा येथील सर्वे क्र.१५५/अ मधील प्लॉट क्र. २ ज्याची चतुःसीमा पुर्व-पश्चिम लांबी ३० फुट आणि दक्षिण-उत्तर रुंदी ४० फुट यामध्ये प्रतिवादीची मालकी कब्जेवहिवाट आहे. प्रथमदर्शनी अभिलेखाचे अवलोकन करता असे दिसुन येते की, दावा मिळकतीच्या चतुःसिमामध्ये प्रतिवादीची मिळकत नाही. प्रतिवादीची मिळकत ही दावा मिळकतीच्या लगत आहे असे देखील वादीचे कथन

नाही. प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, प्रतिवादी हा त्याच्या क्षेत्रामध्ये कब्जेवहिवाट करतो. वादीच्या म्हणण्यानुसार प्रतिवादीने दावा मिळकतीमध्ये पत्र्याचे शेड उभा करण्याचे काम सुरु केले आहे. प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, याबाबत वादीने कोणताही पुरावा दाखल केला नाही. शेडबाबत छायाचित्रे वादी दाखल करु शकत होता. सबब प्रथमदर्शनी दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी पत्र्याचे शेडचे उभारणीचे काम करत आहे असे दिसुन येत नाही.

(६). वादीने विनंती कलमामध्ये मुळ विषय हा दावा मिळकतीमध्ये प्रतिवादीने हरकत अडथळा करु नये असा निरंतर हुकूम मागितलेला आहे. प्रस्तुत अर्जामध्ये देखील वादीने दाव्याचा निकाल लागे पावेतो प्रतिवादीने दावा मिळकतीस हरकत अडथळा करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूम मागितलेला आहे. दाव्याचे स्वरुप लक्षात घेता वादीने विनंती केल्याप्रमाणे अर्ज मंजूर केल्यास वादीचा दावा पुराव्याशिवाय या टप्प्यावर मंजूर झाल्यासारखे होईल. वादीने प्रथमदर्शनी वस्तू:स्थिती त्याच्या लाभात असल्याचे सिध्द केले नाही. दाव्याचे स्वरुप लक्षात घेता न्यायाचा समतोल वादीच्या लाभात आहे असे दिसुन येते नाही. अर्ज मंजूर केल्यास वादीचे नुकसान होईल असे प्रथमदर्शनी दिसुन येत नाही. म्हणून मी मुद्दा क्र. १ ते ३ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. ४ करीता :–**

(७). वादी त्याच्या लाभात प्रथम दर्शनी वस्तुस्थिती सिद्घ करू शकला नाही. सबब मी मुद्दा क्र. ४ चे उत्तरा दाखल खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज खर्चासह नामंजुर करण्यात येतो.

३. अर्जाचा खर्च मुळ दाव्यासोबत.

(खुल्या न्यायालयात जाहीर व अधिघोषित)

Digitally signed by KOLEKAR PRASAD DIPAK
Date: 2022.05.06 18:11:29 +0530

दिनांकः– ०५/०५/२०२२ (पी.डी.कोळेकर)

औसा. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, औसा.